जा.क्र. राज्य योजना/ १०१५/२०१८
राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण,
सिडको भवन, ४ था मजला, दक्षिण कक्ष
बेलापूर, नवी मुंबई.
दि. २८.०६.२०१८

प्रति,
प्रकल्प संचालक
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, भंडारा

विषय : पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनाअंतर्गत मार्गदर्शन मिळणेबाबत.

संदर्भ : १) आपलेकडील पत्र क्र. जिग्राविय/मं/अभि/पंदीउजाखयो/२७८/२१८ दि. ३०.०५.२०१८
२) या कार्यालयाकडील पत्र जा.क्र. १०६५/राव्यक/ग्रागृ/पंदीउ/२०१८, दि. १६.०२.२०१८
३) अवर सचिव, ग्राम विकास यांचेकडील पत्र कग. प्रआयो/२०१८/प्र.क्र.१४९/योजना-१०, दि. ०८.०५.२०१८

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये आपण पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना अंतर्गत घरकुल बांधकामाकरीता परस्पर कुटुंबात जागा खरेदी-विक्री करुन रक्त नात्यातील लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्याकरीता मान्यता देता येईल किंवा कसे याबाबत या कार्यालयाकडे मार्गदर्शन मागितले आहे.

याबाबत उपरोक्त संदर्भ क्र. २ नुसार शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले होते. संदर्भ क्र. ३ अन्वये शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त झाले आहे. त्यानुसार रक्ताच्या नात्यात जागा खरेदी केल्यास सदर लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये याकरीता, अशा प्रकरणी केवळ स्वतंत्र कुटुंबे असल्याची खात्री करुनच असा लाभ देण्यास हरकत नसलेबाबत कळविले आहे.

तरी आपण आपल्यास्तरावरुन पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

धनंजय माळी (भा.रा.से.)
संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण,
महाराष्ट्र राज्य

प्रत : प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) यांना माहितीसाठी.

DAPDU प्रमाणपत्र 1 2 Letter.docx

# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, भंडारा

ई-मेल : drdabhandara@gmail.com
दुरध्वनी क्रमांक :०७१८४-२५२३०६

क्रमांक जिग्राविय/पं/अभि/पंदीउजाखयो/ 278 /18 दिनांक:30/05/2018

प्रति,
मा.संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष,
ग्रामीण गृहनिर्माण सिडको भवन,
५ वा मजला,दक्षिण कक्ष,बेलापूर
नवी मुंबई

विषय : पंडीत दीनदयाळ उपाध्याय अर्थसहाय्य जागा खरेदी योजना अंतर्गत मार्गदर्शन मिळणेबाबत.

महोदय

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सविनय कळविण्यात येत आहे की भंडारा जिल्ह्यामधील पंचायत समिती स्तरावरुन पंडीत दीनदयाळ उपाध्याय अर्थसहाय्य जागा खरेदी योजना अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना,रमाई आवास घरकुल योजना व शबरी आवास घरकुल योजनेच्या घरकुल लाभार्थ्यांकरीता परस्पर कुटुंबात खरेदी विक्री करुन स्वत नात्यातील लाभार्थ्यांचे प्रस्ताव पंचायत समिती मार्फत या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत त्या अनुषंगाने शासन निर्णय 14 जुलै 2017 मध्ये दिलेल्या निकषानुसार वर्णनप्रमाणे प्रस्तावाचा लाभ होत नाही तरी सदर लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजूर करावे किंवा कसे याबाबत अडचण निर्माण झालेली आहे याबाबत कृपया मार्गदर्शन प्राप्त झाल्यास लाभार्थ्यांचे प्रस्तावास मंजुरी देणे सोईचे होईल.

प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
भंडारा

याबाबत उपसंचालक (ग्रा.गृ.यो.) यांचे मार्गदर्शनार्थ ठेवावे.